Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# राजर्षी शाहु पुत्र राजाराम यांचे कृषीविषयक अध्ययन व कृषी धोरण

**श्रीराम श. साळुंखे**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रास्ताविक:**

राजर्षी शाहू यांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेत चांगले शिक्षण आणि उत्तम प्रकारचे आरोग्य प्रजेला प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानास शिक्षणाबाबत स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. त्यामुळे समाजातील सर्व वर्गातील मुला-मुलींना शिक्षण घेणे शक्य झाले. पदवी शिक्षणासाठी जास्त आर्थिक तरतूद करावी लागते म्हणून महाविद्यालयीन शिक्षणाऐवजी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले. पुढे शिक्षणावर अधिक प्रमाणावर खर्च होऊ लागल्याने त्यांनी राजाराम कॉलेज बंद करण्याचाही निर्णय जाहीर केला होता. पर्याय म्हणून हे महाविद्यालय चालवण्यासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटी, अमेरिकन मिशन इत्यादींशी त्यांनी संपर्क साधला होता. त्यांनतर अखेरीस राजाराम कॉलेज हे आर्य समाजाकडे सोपवले. पदवी शिक्षणामध्ये अभियांत्रिकी, रसायनशास्त्र, कृषी इत्यादी विषयांचा समावेश करण्याकडे त्यांचे विशेष लक्ष होते. शिक्षणाबाबत त्यांनी स्वीकारलेली भूमिका त्या समकालाच्या तुलनेत खरोखर क्रांतिकारक होती. त्यांचे शिक्षणविषयक विचार आधुनिक राहिले. आधुनिक व्यावसायिक शिक्षणासाठी ते प्रयत्न करत राहिले. प्रस्तुत शोधनिबंधात राजाराम महाराजांच्या कृषीशिक्षणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**राजाराम महाराजांचे इंग्लंड मधील शिक्षण:**

शिवाजी आणि राजाराम  या आपल्या दोन्ही मुलांना आधुनिक पद्धतीचे शिक्षण देण्याचे त्यांनी निश्चित केले होते. त्यासाठी त्यांना पाचगणी येथील मिशनरी शाळेत ठेवण्याचा निर्णय घेतला. परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्यांना आपल्या मुलांना तेथे पाठवणे शक्य झाले नाही. तसेच पाचगणी मिशन स्कूलच्या धरतीवर रुकडी येथे स्कूल सुरू करण्याचा त्यांनी संकल्प सोडला होता. या स्कूलची जबाबदारी पाचगणी येथील मिशनच्या पदाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात येणार होती. मात्र ही योजना यशस्वी झाली नाही. पुढे राजर्षी शाहू यांनी कोल्हापूर येथेच आपल्या दोन्ही मुलांना शिक्षण देण्याचे निश्चित केले. त्यासाठी डॉ. एम.जी आयर्विन यांची राजगुरू म्हणून नियुक्ती केली. डॉ. आयर्विन यांनी वेदांचा तुलनात्मक अभ्यास करून पीएचडी पदवी संपादन केले होती. साधारणपणे एक वर्ष आयर्विन यांचे मार्गदर्शन शाहूंच्या पुत्रांना लाभले. दुर्दैवाने दाजीपूर जंगलात आयर्विन यांचे अकाली निधन झाल्याने आपल्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न शाहूंच्या पुढे निर्माण

झाला. अखेरीस त्यांनी डॉ. आयर्विन यांची पत्नी हेलन आयर्विन यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या मुलांना इंग्लंड येथे पाठवण्याचा निर्णय घेतला. शाहूंच्या मुलांबरोबर शाहूंचे बंधू बापूसाहेब, दिवाण सबनीस व इतर पाच सरदारांची मुलेही सहभागी झाली होती. त्यांना ११ मे १९१२ रोजी इंग्लंड येथे पाठवण्यात आले. त्या सर्व मुलांची जबाबदारी हेलन आर्यविन यांच्यावर सोपीविली होती. त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले होते. त्याच्यासाठी उत्तम प्रतीचे स्कूल निवडून शिवाय त्यांच्या वास्तव्याची चांगल्या प्रकारे सोय केली. आयर्विन यांचे वैयक्तिक लक्ष असल्यामुळे मुलांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन होऊ लागले. त्यांच्या प्रगतीची माहिती नियमितपणे शाहूंना कळविण्यात येत असे. मुलांना पारंपरिक स्वरूपाचे शिक्षण न देता अभियांत्रिकी आणि रसायनशास्त्र विषयक शिक्षण देण्याबद्दल त्यांनी सूचित केले होते. [१] मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे याबाबत शाहू महाराजांनी आयर्विन यांना पुढीलप्रमाणे कळवले होते. “विश्वविद्यालयाच्या अभ्यासापेक्षा रसायनशास्त्र, अभियांत्रिकी किंवा कृषी शिक्षण माझ्या वडील मुलास देण्याचा प्रयत्न करावा. कारण मला विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमाबाबत फारसे समाधान वाटत नाहीत.”[२] यावरून असे दिसते की, त्यावेळी शाहू महाराज आधुनिक शिक्षण पद्धतीबाबत किती आग्रही होते हे दिसून येते.

**राजाराम आणि कृषी अभ्यास:**

राजाराम महाराज यांना प्राथमिक शिक्षणापासूनच कृषी अभ्यास शिकविण्याचा विचार शाहू महाराजांचा होता. राजर्षींच्या सूचनेप्रमाणे आयर्विन यांनी राजाराम यांच्यासाठी कृषी अभ्यासक्रम असलेल्या संस्थेत प्रवेश मिळवून दिला. या संस्थेची सविस्तर माहिती आयर्विन यांनी कळवली होती. याबाबत महाराजांनी २४ जुलै १९१४ च्या पत्रात आयर्विन यांना कळवले होते की, “राजाराम यांना शेतीबाबत सविस्तर माहिती अभ्यासक्रमाद्वारे प्राप्त करून द्यावी. तसेच केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळवण्यासाठी शेतात त्यांच्याकडून प्रत्यक्ष काम करून घेण्याची सूचना त्यांनी केली होती. राजाराम यास शेतीबाबतचे सविस्तर ज्ञान मिळाले पाहिजे यांकडे महाराजांचा कटाक्ष होता. तसेच त्यांनी अमेरिकेत आयोजित केले जाणाऱ्या शेतकी प्रदर्शनास भेट देण्याबद्दल सुचित केले होते.”[३] परंतु या सुमारास पहिले महायुद्ध सुरू झाल्याने महाराजांनी राजाराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना परत कोल्हापूर येथे येण्याबद्दल सांगितले. तीन वर्षापेक्षा अधिक काळ राजाराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे वास्तव्य इंग्लंड येथे होते. या काळात त्यांनी विविध विषयांचे ज्ञान आत्मसात केले असले तरी कृषी शिक्षणाकडे त्यांनी अधिक लक्ष दिल्याचे दिसते.

**राजाराम व अलाहाबाद येथील ख्रिश्चन कृषी महाविद्यालय:**

“राजर्षी शाहू यांना राजाराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना कृषीबाबत पुरेशी माहिती मिळाली नाही हे समजून आले होते, म्हणून त्यांनी कृषीबाबत अधिक शिक्षण मिळवण्यासाठी अलाहाबाद येथील कृषी महाविद्यालयात पाठवण्याचा निर्णय घेतला. ९ डिसेंबर १९१६ रोजी राजाराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी

अलाहाबाद येथे कृषी शिक्षण घेण्यास प्रारंभ केला.''[४] या कृषी महाविद्यालयाचे सविस्तर माहिती शाहूंच्या काकांनी प्राप्त केली होती. येथील कृषी शिक्षणाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले होते. पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमात फळबागेबाबत विशेष अभ्यासक्रम राजाराम यांनी अभ्यासला होता. विशेष म्हणजे त्यावेळी हेलन आर्यविन यांचे मार्गदर्शन त्यांना अलाहाबाद येथेही मिळत होते. शाहू महाराजांनी अलाहाबाद येथे श्रीमती आर्यविन यांची वास्तव्याची स्वतंत्रपणे सोय केली होती. महाविद्यालयातील अभ्यासक्रम, राजारामाची शैक्षणिक प्रगती इत्यादीबाबतची नियमितपणे माहिती त्या प्राप्त करत असत आणि त्याचा तपशीलवार अहवाल महाराजांना पाठवला जात असे. पहिले वर्ष मुलाच्या प्रगतीच्या दृष्टीने चांगले गेले याबद्दल महाराजांनी समाधान व्यक्त केले होते. पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर उन्हाळयाच्या सुट्टीसाठी राजाराम यांचे कोल्हापूर येथे दोन महिने वास्तव्य होते. या काळात श्रीमती आर्यविन यांच्याकडे महाराजांनी राजाराम कॉलेजमधील अनुभवी अशा प्राध्यापकास मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविली होती.

राजाराम यांनी दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमास प्रारंभ केल्यानंतर काही समस्या निर्माण झाल्या होत्या. याबाबतची माहिती शाहूंना समजली होती. त्याचबरोबर महाविद्यालयात प्राध्यापकाची संख्या अपुरी असल्याने मुलांना योग्य प्रकारे मार्गदर्शन मिळत नसल्याचे ही त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी श्रीमती आर्यविन यांच्याकडे विचारणा केल्यानंतर त्यांना महाविद्यालयाच्या कामकाजात काही उणीवा असल्याचे जाणवले.[५] म्हणून या महाविद्यालयाचे शैक्षणिक वातावरण पाहण्यासाठी शाहू महाराजांनी परत आपल्या काकांना पाठवले. त्यांनी महाविद्यालयातील कामकाजाची बारकाईने माहिती घेतली. प्राचार्य जानवीर यांची भेट घेतली. त्यांनी अभ्यासक्रमाबाबत समाधानकारक उत्तरे न देता राजाराम आणि त्यांच्या सहकार्याबद्दल काही तक्रारी सादर केल्या. त्यामुळे अशा वातावरणात अलाहाबाद येथे राजाराम यास ठेवणे महाराजांना योग्य वाटले नाही. म्हणून त्यांनी पहिले सत्र पूर्ण झाल्यानंतर मुलांना बोलावून घेतले. अलाहाबाद येथील दीड वर्षाच्या कालावधीत राजाराम यास काही प्रमाणात कृषीविषयक शिक्षण मिळाले असले तरी महाराज त्याबाबत फारसे समाधानी राहिले नाही. त्यांना इंग्लंड प्रमाणेच उच्च दर्जाचे शिक्षण अलाहाबाद येथील महाविद्यालयात मिळेल असे वाटत होते परंतु त्यांना अपेक्षेप्रमाणे शिक्षण मिळाले नाही त्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केली .

**राजाराम महाराज व कृषिविषयक धोरण:**

अलाहाबादहून कोल्हापूर येथे राजाराम आल्यानंतर पुढील शिक्षणाबाबत शाहू फारसे अनुकूल नव्हते. कारण या सुमारास पहिल्या महायुद्धाची तीव्रता बरीच वाढली होती. जर्मनीचे संकट दिवसे दिवस तीव्र होत होते म्हणून महाराजांनी राजारामांना प्रशासनाचे धडे देण्याचा निर्णय घेतला. या सुमारास लष्कर भरती आणि युद्धासाठी निधी गोळा करण्याची जबाबदारी राजाराम यांच्याकडे सोपवली. या दोन्ही कार्यात राजाराम यांनी महाराजांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. त्याबद्दल महाराजांनी राजाराम यांचे कौतुक केले. कोल्हापूर

संस्थानाची जबाबदारी शाहूंनंतर राजाराम यांच्याकडे देणार होते. त्यासाठी प्रशासन निर्णयात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नयेत याबाबत महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. त्यासाठी आवश्यक असे मार्गदर्शन राजाराम यास उपलब्ध करून दिले होते.

**राजाराम महाराजांच्या कृषी शिक्षणाचे झालेले परिणाम :**

थोडक्यात कोल्हापूर राज्य हे कृषी व्यवस्थेवर अवलंबून असल्याने आपल्यानंतर येणारा सत्याधीशांस कृषी विषयक मुलगामी स्वरूपाचे ज्ञान मिळाले पाहिजे. याकडे शाहूंचा कटाक्ष होता. म्हणून त्यांनी लंडन आणि अलाहाबाद येथे आधुनिक पद्धतीचे कृषी विषयक ज्ञान राजाराम यास उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. यामध्ये राजाराम यांनी मिळालेल्या ज्ञानाचा पुढील काळात योग्य रीतीने उपयोग करून घेतला. सन १९२२ मध्ये संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी कृषी विभागाकडे विशेष लक्ष दिले. कृषी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या मदतीने त्यांनी संपूर्ण संस्थानाचा कृषी विषयक अहवाल तयार केला. त्याच्या आधारावर कृषी विषयक निर्णय पुढील काळात घेतले गेले. विशेष म्हणजे त्या काळात त्यांनी बी.एससी. ॲग्री अशा पदव्या प्राप्त केले. त्यांची शेती विभागात नेमणूक केली त्यामुळे कोणत्या भागात कोणत्या प्रकारचे पीक घ्यावे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन होऊ लागले. विशेष म्हणजे राजाराम महाराजांनी फलोद्यानाचा उपक्रम कोल्हापूर राज्याच्या पूर्व भागात यशस्वी राबविला. यामध्ये पेरु, द्राक्ष, आंबा, पपई, केळी यांसारख्या फळबागांसाठी आधुनिक तंत्राचा उपयोग केला.[६] त्यामुळे फळबागांच्या बाबतीत कोल्हापूर संस्थांना त्यांच्या काळात लौकिक प्राप्त झाला.

छ. राजाराम महाराजांनी शेती क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य केले. त्यांनी स्वतः आधुनिक कृषीशास्त्राचा अभ्यास केलेला असल्यामुळे आपल्या कारकिर्दीत शेतीमध्ये अनेक आधुनिक प्रयोग करण्यास प्रेरणा दिली. कोल्हापूर येथे साखर कारखाना सुरू करण्यात आला. त्यासाठी शेतकऱ्यांना ऊस लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रोत्साहित केले.

संस्थानातील 80% पेक्षा जास्त जनता शेतीवर अवलंबून होती. त्यामुळे शेतीच्या प्रगतीकडे राजाराम महाराजांनी विशेष लक्ष दिले. शेतीला मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी राधानगरी धरणाचे अपूर्ण काम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. कसबा बावडा येथे पंचगंगा नदीवर कोल्हापूर बंधारा उभारला. हा बंधारा राजाराम बंधारा म्हणून ओळखला जात होता. शेतकरी वर्गास शेतीबाबतचे अद्यावत असे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी महाराजांनी लॉर्ड आर्यविन शेतकी संग्रहालयाची स्थापना 19 नोव्हेंबर, 1929 रोजी केली. शेतकऱ्यांना लोखंडी नांगर भाड्याने देण्याची व्यवस्था केली. 100 शेतकऱ्यांना आधुनिक शेतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संग्रहालयात प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या मदतीने शेतकरी वर्गास आपल्या शेतीत योग्य त्या सुधारणा करणे शक्य झाले.

**सारांश:**

राजर्षी शाहू हे द्रष्टे राजकर्ते होते .आपल्या नंतर शेतकऱ्यांचे हिताचे निर्णय घेतले जावेत यासाठी भावी सत्ताधीश प्रयत्नशील असले पाहिजेत, या भूमिकेतून त्यांनी युवराज राजाराम यांची जडणघडण केली होती. त्याचा फायदा कोल्हापूर संस्थानाच्या प्रजेस झाला हे निश्चित म्हणावे लागेल. राजाराम महाराजांनी घेतलेल्या कृषी शिक्षणामुळे त्यांचे धोरण आपल्या राज्यातील कृषी विकासाच्या उन्नतीसाठी ते महत्त्वाचे ठरले हे दिसून येते.

**संदर्भ सूची:**

1. अण्णासाहेब बाबाजी लट्ठे (संपादक), श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, प्रकाशक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८, द्वितीय आवृत्ती, पृ. ३११
2. उपरोक्त, अण्णासाहेब बाबाजी लट्ठे, पृ. ३१३.
3. कित्ता, पृ. ३१५
4. राजर्षी शाहू पेपर्स, Vol. 1997, पृ.१३७.
5. उपरोक्त, राजर्षी शाहू पेपर्स, पृ.१७९
6. उपरोक्त, राजर्षी शाहू पेपर्स, पृ. २९३
7. माने ए. आर., छत्रपती राजाराम आणि त्यांचा काळ (1922-1940) पीएच. डी. प्रबंध (अप्रकाशित), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8. गर्गे स. मा., करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, तिसरी आवृत्ती
9. हरेल केशव, छत्रपती राजाराम महाराज : सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, अक्षर दालन प्रकाशन, कोल्हापूर